श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ८ वें ] [ अंक १०.

नलिनीदलगतजलमतितरलं । तद्वज्जीवितमतिशयचपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका:

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| उदींचा अनुभव ... ... ... ... ... | १ |
| श्री कायम फंडखातें ... ... ... ... | २—६ |
| श्रीरामनवमीच्या हिशोबाच्या खर्ड्यांतील जमेकडील चुकीची दुरुस्ती ... ... | ७ |
| उत्सवाचा कार्यक्रम ... ... ... ... | ८ |
| कै० भक्तवर्य श्री. आण्णासाहेब करंदीकर अत्यल्प चरित्र-लेख ... ... ... | ९–१५ |
| श्री शेठ फिरोजशहा होर्मसजी यांच्या अनुभवावर सुचलेले विचार ... ... | १६–२० |
| अर्वाचीन-भक्तलीलामृत अध्याय ३१ वा (पुढें चालू) ... | ९–१६ |


## विनंति.


सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वीं छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**


## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक

## उदीचा अनुभव

श्रीसाई बाबांच्या उदीनें मला बरेच दिवस श्राव होत असलेला बरा झाला. तरी रुपया १ साई चरणीं वाहून बाबांची प्रसादरूपि " उदी " पाठविण्याची मेहेरबानी व्हावी. उदी पाठवावी.

मु. खोचिवडे. पोष्ट वसई<br>ता. १३--७--१९३१ } **सौ. अनीबाई दामूल लखमन कोळी.**

2

# विनंती.

रा. रा. संपादक, श्री साईलीला यांस,—

सा. न. वि. वि. श्री शिरडी संस्थानच्या निरनिराळ्या उत्सवांसाठीं रकमा देणारांचीं नांवें उत्सवाच्या अहवालासोबत आपण आपल्या मासिकांत छापून प्रसिद्ध करितां, तरी या संस्थानच्या इतर फंडांत वर्गणी देणारांचीं नांवें वेळोवेळीं आपणांकडे पाठवून देऊं, जेणेंकरून कांहीं भूलचूक अथवा गैरसमजूत झाल्यास ती दुरुस्त करण्यास सुलभ होईल.

आपला,

**रा. आ. तर्खड**

आ. खजिनदार

**श्री साई बाबा शिरडी संस्थान**

वरील विनंती आदरपूर्वक मान्य करून श्री खजिनदारांकडून वेळोवेळीं जीं जीं पत्रकें येतील तीं मोठ्या आनंदानें मासिकांत प्रसिद्ध करण्यांत येतील.

**रा. आ. तर्खड.**

संपादक, **श्री. साईलीला**

# श्री कायम फंड खातें

| | | | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| १९३१ मार्च | २१ | श्री दाजी विठ्ठल सांबारे, पार्ले | ६-०-० |
| ,, | ,, | ,, विष्णू गंगाधर गाडगीळ, नागपूर | ५-०-० |
| ,, | २३ | ,, र. भा. पुरंदरे, केळवा रोड | ०-५-६ |
| ,, | ,, | ,, राधाबाई पेंढारकर | ५-०-० |
| ,, | २४ | ,, रा. ब. आ. के. कुळकर्णी दिवाणसाहेब खंभात | १०-०-० |
| ,, | २६ | ,, श्री मुंदरजी चनाप्पा दावणगिरी, हस्तें आ. ला. आरोळकर | ३००-०-० |
| ,, | २८ | मे. फिरोज शाह हार्मसजी पदमजी | २०-०-० |
| ,, | ,, | श्री. शामराव आर. वि. जयकर, पार्ले | ६-८-० |
| ,, | २९ | ,, नागेश आत्माराम सावंत, भोईवाडा परळ | २-०-० |
| ,, | ३० | ,, पार्वतीबाई ओझरकर, ठाणें | १०-०-० |
| ,, | ३१ | ,, श्रीपाद रामचंद्र फाटक, सोलापूर | ३-०-० |
| ,, | ,, | ,, पुतळाबाई गजानन नवलकर, खेतवाडी, मुंबई | ५-०-० |
| ,, | ,, | ,, रा. सा. बाळासाहेब देव | ०-७-० |
| एप्रिल | २ | श्री. ना. न. फडणीस जळगांव | ३-०-० |
| ,, | ,, | ,, य. ज. गाळवणकर, मार्च | ५-०-० |
| ,, | ६ | ,, वयापटन भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०-०-० |
| ,, | ७ | ,, सौ. उमाबाई देव, एप्रिल श्री विलास शिरा | ५-०-० |
| ,, | ,, | ,, उमाबाई देव पेटी, मार्च | २-०-० |
| ,, | ८ | ,, डॉ. हिरालाल आर क्लार्क, खंभात | १०-०-० |
| ,, | १० | ,, श्री. बाळकृष्ण सीताराम बोरवणकर, ठाण | १-०-० |
| ,, | ,, | ,, हरी गोपाळ सकपाळ | ३-०-० |
| ,, | ,, | ,, जमियतराम जगजीवन | १-४-० |
| ,, | ,, | ,, माणेकशाह एच्. सुखडवाला | |
| ,, | ,, | ,, आनंदराव माधवराव पाकडल | |
| ,, | ,, | सौ. काशीबाई कानिटकर | |
| | | | ४२३-१२ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | ४२३-१३-९ |
| एप्रिल | ,, | श्री. भाऊ आप्पाजी वैद्य | २१-४-० |
| ,, | ,, | ,, बाबाजी आनंदराव मोहिले | १-०-० |
| ,, | ,, | ,, लक्ष्मण गोविंद मुंगी, नाशिक | १-०-० |
| ,, | ,, | ,, सुंदरराव दीनानाथ नवलकर | ०-०-६ |
| ,, | ,, | ,, रा. सा. बा. वि. देव | ०-२-० |
| ,, | १७ | सौ. लक्ष्मी देवी तर्खड, | ५-०-० |
| ,, | ,, | श्री. गो. माधवराव विजयकर | ५-०-० |
| ,, | २० | ,, बाळकृष्ण राघव सावंत | १-०-० |
| ,, | ,, | ,, सदर सदर एप्रिल | १-५-३ |
| एप्रिल | २४ | श्री. सदाशिव विश्वनाथ देव, पौंड मुळशी पेठा | १-८-० |
| ,, | ,, | ,, जीवनराम कल्याणजी शुक्ल, उंबरगांव | १-४-० |
| ,, | ,, | ,, जनार्दन कृष्ण देव, वसई | १-४-० |
| मे | ३ | ,, य. ज. गाळवणकर, एप्रिल | ५-०-० |
| ,, | ५ | ,, ना. न. फडणीस, जळगांव | ३-०-० |
| ,, | ,, | ,, आ. ला. आरोळकर, गुंटाकळ | ३-८-० |
| ,, | ७ | रा. ब. आ. के कुळकर्णी, खंभात | १०-०-० |
| ,, | ,, | डॉ. हिरालाल आर. क्लार्क, खंभात | १०-०-० |
| ,, | ,, | श्री. आर. व्ही. पाटणकर, नाशिक | १-४-० |
| ,, | ,, | ,, एस्. एस्. सामंत, ठाणें | २-०-० |
| ,, | ,, | ,, बाळकृष्ण रा. सावंत | १-५-३ |
| ,, | ९ | कॅप्टन भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०-०-० |
| ,, | १० | श्री. हरी कृष्ण भाटवडेकर | २-०-० |
| ,, | १५ | ,, के. ए. बेंद्रे, अलिबाग | २-४-० |
| ,, | १९ | ,, आ. पु. जोळस, जानेवारी ते जून ८ आ. प्र. | ३-०-० |
| ,, | २० | ,, माधवराज राव, दावणगिरी | १-०-० |
| | | | ५१७-१४-९ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | ५१७–१४–९ |
| मे | २१ | रा. बळवंत हरी कर्णिक, वांद्रें | ५–०–० |
| ,, | २४ | डॉ. छोटालाल भोलाभाई भट, मुरबाड | ५–०–० |
| ,, | ,, | श्री. पंडित आशाराम मिश्र, खंडवा | ५–०–० |
| ,, | २८ | ,, गोखले पेन्शनर महालकरी, ठाणें | ३–०–० |
| ,, | ,, | सौ. कमळाबाई देव, श्री विलास शिरा मे | ५–०–० |
| ,, | ,, | ,, ,, ,, पेटी एप्रिल | २–०–० |
| ,, | ,, | ,, उमाबाई देव, श्री विलास शिरा जून | ५–०–० |
| ,, | ,, | ,, ,, ,, पेटी मे | २–०–० |
| जून | ३ | श्री. य. ज. गाळवणकर, मे | ५–०–० |
| ,, | ,, | ,, ना. न. फडणीस, जळगांव | ३–०–० |
| ,, | ४ | ,, आ. ला. आरोळकर, गुंताकल | ६–०–० |
| ,, | ,, | ,, आर. व्ही पाटणकर, नाशीक | १–४–० |
| ,, | ५ | ,, घनश्याम शिवराम पोतदार, मुंबई | १०–०–० |
| ,, | ९ | कॅप्टन भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०–०–० |
| ,, | ,, | डॉ. हिरालाल आर. क्लार्क, खंमात | १०–०–० |
| ,, | १२ | श्री. खंडेराव बाळाजी नाईक, मुंबई | १–४–० |
| ,, | १७ | ,, बाळकृष्ण राघव सावंत, जून वांद्रें | १–५–३ |
| | | | ५९७–१२–० |

**श्री भक्तमंडळ खातें.**

| | | | |
|---|---|---|---|
| १९३१ मार्च | ३१ | कु. शांताबाई ब्रम्हांडकर, मुंबई १८५१।२ | १०–०–० |
| ,, | ,, | ,, चिंतामण परशराम भिडे, वांई १८५१।२ | ५–०–० |
| ,, | २५ | ,, जि. कृ. परूळकर, मुंबई १८५१–५२ | १०–०–० |
| एप्रिल | ८ | ,, र. ह, वाटवे, कराची १८५२ | ५–०–० |
| ,, | १२ | ,, हरी गोपाळ सखपाळ, वांद्रें | ५–०–० |
| ,, | ,, | ,, पुरुषोत्तम गोपाळदास चडियाळी | १०–०–० |
| ,, | ,, | ,, हरिभाऊ शिरसाठे | १०–०–० |
| ,, | १३ | ,, जी. व्ही. प्रधान, मुंबई | ५–०–० |
| | | | ६०–०–० |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | ६०-०-० |
| एप्रिल | १७ | सौ. लक्ष्मीबाई गो. गाडगीळ १८५११२ पुणें | १०-०-० |
| ,, | | ,, रा. रा. गो. का. गाडगीळ १८५३ पुणें | ५-०-० |
| ,, | २० मे | ,, D. M. Raja पार्शी कॉलनी, दादर | १०-०-० |
| मे | ७ | रा. रा. एस्. एस्. कर्णिक, अलिबाग | १०१-०-० |
| ,, | ११ | ,, व्ही. के. शिरवळकर, मिकटिला, ब्रह्मदेश | ५-०-० |
| ,, | २० | ,, रामचंद्र व्यंकटेश सुगंधी, विजापूर | ५-०-० |
| जून | ६ | ,, र. ह. वाटवे, अहमदाबाद | ५-०-० |
| ,, | १२ | ,, सरदार एम्. व्ही. किबे, इंदूर १८५०१ | १०-०-० |
| | | | २११-०-० |

**श्री कोठी खातें**

१९३१ एप्रिल १२ रा. रा. हरि गोपाळ सखपाळ, वांद्रे

आक्टोबर १९३० ते मार्चअखेर १९३१

६ महिने रु. १ द. म. प्र. रु. ६—०—०

# मागील अंकांत श्री रामनवमीच्या हिशोबाच्या खर्ड्यांतील जमेकडील चुकीची दुरुस्ती.

रा. रा. र. भा पुरंदरे यांच्या मार्फत जमा आली त्यांत श्री. काशीबाई कानिटकर यांच्या नांवानें पांच रुपये जमा पाहिजे, पण एकच रुपया जमा आहे. शिवाय रकमा वर्गणी देणाराच्या नांवापुढें नसल्यामुळें त्या चुकीनें खालींवर झाल्या. त्यामुळें पुरंदरे यांच्याकडून आलेली जमा तपशीलवार पुन्हा दिली आहे.

**जमा** **खर्च**

**४५॥ श्री. र. पुरंदरे याचेमार्फत**

१ ,, मुकुंदराव महादेव मोहिले.
२ ,, पुरुषोत्तम गोपळदास घडियाळी.
२ ,, हरिभाऊ शिरसाठे.
२ सौ. चंपुबाई आर. चोणकर.
५ श्री. आनंदराव खंडेराव माहिमकर.
५ सौ. काशिबाई कानिटकर.
१ श्री. लक्ष्मण गोविंद मुंगी.
११ ,, रामचंद्र सिताराम देव.
५ ,, हरिश्चंद्र मिस्त्री अंधेरी.
४ ,, श्रीकृष्ण पाटील, अंधेरी.
२ ,, विनायक गिरिधर तलाटी.
२ ,, जनार्दन आत्माराम.
२ ,, छगनलाल के. मुरकुटे.
१ ,, गणेश आत्माराम कानिटकर.
-॥- ,, दशरथ गणपत मदन.

४५॥

**दासगणू.**

# श्री सद्गुरु साईबाबा प्रसन्न

सप्रेम सा. न. वि. वि. सालाबादप्रमाणें **श्रीगुरुपौर्णिमेचा उत्सव** मिति आषाढ शुद्ध पौर्णिमा रोज बुधवार ता. २९ जुलई १९३१ रोजीं श्री क्षेत्र शिर्डी येथें होणार आहे. तरी आपण सदर प्रसंगीं मित्रमंडळीसह अवश्य येण्याची कृपा करावी, अशी विनंती आहे.

कोपरगांव स्टेशनवरून शिर्डीस जाण्यासाठीं आपल्याला बैलगाडी हवी असल्यास ४ दिवस अगाऊ श्री साईबाबा शिर्डी संस्थान कमिटीचे व्यवस्थापक श्री. **बाळा पिलाजी गरव** यास शिर्डी मुक्कामीं लिहून कळवावें म्हणजे गाडीची व्यवस्था करण्यांत येईल.

भक्तमंडळाची वार्षिक वर्गणी आपल्याकडे येणें राहिली असल्यास ती कृपा करून ऑ. खजिनदाराकडे पाठवून द्यावी.

उत्सवाप्रीत्यर्थ कांहीं पाठविणें असल्यास ऑ. चिटणीस श्री. **सुंदरराव दि. नवलकर,** साईभुवन १४१ प्रिन्सेस स्ट्रीट. मुंबई नं. २ अथवा ऑ. खजिनदार श्री. **रामचंद्र आ. तर्खड,** जर मॅन्शन वांद्रें, मुंबई नं. २०, या पत्त्यावर पाठवावें. कळावें, लोभ असावा, ही विनंती.

## उत्सवाचा कार्यक्रम.

बुधवार आषाढ शु. पौर्णिमा ता. २९ जुलई

सकाळीं—रुद्राभिषेक, श्रीची पूजा व प्रसाद.

दुपारीं—४ वाजतां संस्थान कमिटीची सभा.

रात्रौ -९ वाजतां रथाची मिरवणूक.

गुरुवार आषाढ वद्य १ ता. ३० जुलई.

दुपारी—भंडारा. रात्रौ भजन, पालखी व चावडी.

शुक्रवार आषाढ वद्य २ ता. ३१ जुलई.

सकाळीं—काला.

**सुंदरराव दि. नवलकर.**
ऑ. चिटणीस.
**रामचंद्र आ. तर्खड.**
ऑ. खजिनदार.

सेवेशीं साईदास,
**केशव गोपाळ बुटी.**

श्रीदत्तचित्साईगुरुभ्योनमः

# कै. भक्तवर्य श्रीयुत आण्णासाहेब करंदीकर यांच्या संबंधानें लिहिलेला अत्यल्प चरित्र-लेख.

गुप्त साईभक्त रत्न कै. श्रीयुत जनार्दन धोंडदेव ऊर्फ
आण्णासाहेब करंदीकर मल्याण ( डहाणू रोड स्टेशन )



मंदाक्रांता.

हा हा ! आण्णा, परम सुहृदा, प्रेमळा, ज्येष्ठ बंधो ।
श्रीरामांघ्रीं दृढ भरवसा ठेवुनी, धैर्य सिंधो ।
चातुर्यानें भवजलधिच्या पार, बाहुबलानें ।
गेला ! गेला ! खचित तरुनी साईश्रीच्या कृपेनें ॥ १ ॥

कैसें प्रेमें निशिदिनीं मुदा[1] आदरातिथ्य भावें ।
आल्या गेल्या वरि उपकृती, पाहुणेरा[2] करावें ।
कर्तव्यें ही समजुनि मनीं, अंतिमार्था[3] जिणावें ।
ऐशा युष्मद्गृहिं वॅर[4] गृहस्थाश्रमाते शिकावें ॥ २ ॥
हा हा ! आण्णा मजवरि खरें आपुलें प्रेम मोठें ।
होते याची स्मृति मज जई तत्क्षणीं कंठ दाटे ।
खंती वाटे प्रबल मनिं कीं भेटी ना अंतकाळीं ।
अंतर्वैरीपण, हतविधे ! येत माझ्या कपाळीं ॥ ३ ॥
वृद्धावस्था, कृशतनु, वया पुण्य अब्दें[5] अशीती[6] ।
काशी यात्रा श्रमज विषमें येत अस्वास्थ्य चित्तीं[7] ।
याची वार्ता मज नच, जरी मालवे प्राण जोती ।
धिग्दैवा ! मत्स्मृति न कवणा ! त्वत्प्रकौटिल्य[8] रीती ॥ ४ ॥
आशा आतां मुळिं न आपुल्या जागृती-दर्शनाची ।
प्रेमोक्तींची तशिच आपुल्या साधुसत्संगतीची ।
आतां स्वप्नीं तरि कधि कधीं दर्शना देत जावें ।
ठेवूनीया शिर शुभपदीं प्रार्थितों नम्र भावें ॥ ५ ॥

इकडील रहाळांत, तसेंच पुणें, ठाणें, मुंबई, गुजरात व इतर कांहीं भागांत आण्णांचें नांव माहित नाहीं, असा मनुष्य मिळणें क्वचित्.

## जन्म व निधन.

आण्णांचा जन्म शके १७७२ म्हणजे सन १८५१ च्या सुमारास डहाणू गांवीं त्यांच्या वडिलोपार्जित घरीं झाला. त्यांचें निधन मल्याण ( डहाणू

१ आनंदानें. २ पाहुणचार. ३ मोक्ष. ४ श्रेष्ठ. ५ वर्षें. ६ ऐशी. ७ उत्पन्न झालेल्या विषयमज्वरानें. ८ कुटिलपणाची, दुष्टपणाची.

रोड स्टेशन ) या गांवीं त्यांनीं स्वतः बांधलेल्या घरीं शके १८५३ चैत्र शु० ५ मंगळवार ( बुधवार उजेडतां ) ता. २४ मार्च सन १९३१ रोजीं पहांटे २॥-३ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या वयाच्या ८०--८१ व्या वर्षी झालें. ते आपल्या अंतिम क्षणापर्यंत सावध होते. श्रीमद्भगवद्गीता व श्री विष्णुसहस्रनामपठण व श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबांची आरती व नामगजर यांत त्यांच्या इच्छेनुरूप त्यांचें देहावसान झालें.

त्यांचें द्वितीय कुटुंब त्यांचेपूर्वींच सुमारें दीड वर्ष क्षयानें दिवंगत झालें.

आण्णांच्या प्रयाणकालीं त्यांचे सर्व चिरंजीव, मुली, जामात, नातू व पणतू हजर होते.

## शिक्षण व वाचन.

ते ठाणें, पुणें व मुंबई येथें त्यांच्या लहानपणीं विद्याभ्यासाकरितां राहिले होते त्यांचें बरेंचसें मराठी व इंग्रजी ७ वे इयत्तेपर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांचे डोळे फार दुखूं लागले. व त्यामुळें त्यांना अर्धवट शिक्षण सोडणें भाग पडलें. तथापि त्यांना विद्येची अतिशय अभिरुची असल्यामुळें त्यांचें वाचन दांडगें असून ते फार बहुश्रुत होते.

## वर्तमानपत्रें, मासिकें व पुस्तकसंग्रह.

त्यांच्या घरीं सामाजिक, धार्मिक, पारमार्थिक व वेदांत विषयांच्या संस्कृत व मराठी पुस्तकांचा बराच मोठा संग्रह आहे. त्याचप्रमाणें दैनिक, व अर्धपाक्षिक वर्तमानपत्रें, धार्मिक, पारमार्थिक व व्यापारधंद्याच्या माहितीचीं व निरनिराळे व्यवहारोपयोगी विषयांची मासिकें नेहमीं येत व हल्लींही येतातच. हे सर्व ग्रंथ, वर्तमानपत्रें व मासिकें ते यथावसर वाचीत असत. ते मजकडे येत किंवा मी त्यांच्याकडे जाई अथवा आम्ही दोघे प्रवास करीत असूं, तेव्हां मी त्यांच्याबरोबर श्री ज्ञानेश्वरी, दासबोध, परमामृत, नाथ-भागवत व उपनिषदें वगैरे पारमार्थिक पुण्य ग्रंथ वाचीत असें.

## आवड.

त्यांना सार्वजनिक कामाची, नमस्कारांची, दूध व दुधाचे पदार्थ खाण्याची, देशी खेळांची, देशी वस्तूंची, वैदिक कर्मांची, साधुसंतांची, उद्योगधंद्यांची व शारीरिकबलाची अत्यंत आवड असे. ते शेती करून इतर धंदे करीत. ते आपल्या कामांत फार दक्ष व व्यवहारांत चोख असत. उद्योगधंद्याच्या अभावीं आपला देश भयंकर खालावत चालला आहे याबद्दल त्यांना फार वाईट वाटे.

## सार्वजनिक कामें.

डहाणू येथील नेटिव जनरल लायब्ररी सन १८८९ सालीं त्यांच्याच विशेष परिश्रमामुळें व पुढारीपणामुळें स्थापन झाली.

त्यांनीं डहाणू तालुका लोकलबोर्डाच्या व्हाइस प्रेसिडेंटाचें काम सुमारें १०–१५ वर्षें चोख व निरलसपणानें केलें.

डहाणूस व्यायामशाळा काढण्याची त्यांची अतीशय खटपट होती; परंतु दुर्दैवानें त्यांच्या खटपटीस यश आलें नाहीं.

डहाणू तालुक्यांतील श्री महालक्ष्मी मंदिरापर्यंतच्या सडकेकरितां वर्गणी गोळा करण्याच्या कामीं आण्णांनीं मजबरोबर अत्यंत परिश्रम केले व काम शेवटास नेलें.

पुणें व सातारा यांच्या दरम्यान भोर संस्थानपैकीं शिरवळ गांवीं होत असलेल्या श्री दत्तमंदिराच्या कामीं आण्णांनीं हरएक प्रकारें मदत केली आहे व अजूनही त्यांचे चिरंजीव श्रीयुत रामकृष्णपंत तात्या हे करीत आहेत.

वसईप्रांतिक सभेंत त्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता.

डहाणू येथें नवीन स्थापन झालेल्या सार्वजनिक प्रसूतिगृह व रुग्णशुश्रुषा मंदिराच्या कामीं यांनीं सहानुभूतिपूर्वक चांगली सक्रीय मदत केली आहे.

ते चांगले वक्ते असून निर्भिडपणानें व निस्पृहतेनें बोलण्यास कधींही भीत नसत.

## स्वभाव.

त्यांचा स्वभाव सरळ, प्रामाणिक, परोपकारी, उत्साही, गोड, मनमिळाउ व प्रसन्नचित्त असे. घरांत टापटीप, शिस्त, व्यवस्थितपणा, दूरदर्शित्व, दुसऱ्याबद्दल आदरबुद्धी व शालीनता नेहमीं पाहावयास मिळे. त्यांना स्वधर्माचा, स्वदेशाचा व सत्याचा अत्यंत अभिमान असे. नमस्कार घालून व देशी खेळ खेळून शारीरिक संपत्ति वाढविण्याचा, उद्योगधंदा करून पैसा कमविण्याचा व देशी कपडा व शक्य तितक्या देशी वस्तु वापरून स्वदेशसामर्थ्य वाढविण्याचा ते नेहमीं मुलांना उपदेश करीत व त्यांचें आचरणही त्यांच्या उपदेशाप्रमाणेंच असे. मरेपर्यंत नित्य नेमानें ते नमस्कार घालीत असत. सर्व देशी खेळांत आटयापाटयाचा खेळ त्यांना फार आवडे व ते तो स्वतः खेळत असत.

## तिटकारा.

त्यांना नोकरीचा फार तिटकारा असे. त्यांनीं नोकरी कधीं केली नाहीं. ते प्रथम चहा घेत असत; पण पुष्कळ वर्षांपूर्वीं त्यांनीं तो सोडून दिला. नोकरी न करण्याचा व चहा न घेण्याचा ते मुलांना उपदेश करीत.

## गृहस्थाश्रम.

ते जसे व्यवहारदक्ष होते तसेच त्यांचें लक्ष परमार्थाकडे कमी नव्हतें. स्वार्थ साधून गृहस्थाश्रमाचें योग्य परिपालन करून परमार्थ साधणाऱ्या विभूतींपैकीं ते एक होते. गृहस्थाश्रमाचें बाळकडू त्यांच्या घरीं शिकावें असेंच त्यांचें नमुनेदार वर्तन असे. त्यांचें घर डहाणू रोड स्टेशनला लागून असल्यामुळें त्यांना आल्यागेल्याची नेहमीं अत्यंत वर्दळ असे. त्यांचें सुशील, भाग्यशाली, पतिप्रेमी, पतिपरायण व आज्ञाधारक कुटुंबही त्यांना या कामीं निरलसपणें व आनंदानें मदत करीत असे.

## आल्यागेल्याची वर्दळ.

कोणत्याही जातीचा कोणत्याही वेळीं कोणीही इसम त्यांच्या घरीं आल्यास त्याची चहापाण्याची, जेवणाखाणाची व निजण्याबसण्याची त्यांच्याकडे हटकून सोय होत असे. लहानमोठे अधिकारी, धंदेवाले, व्यापारी, शास्त्री, पंडित, वैदिक, पुराणिक, गवई, कीर्तनकार, भिक्षुक, विद्यार्थि, इतर गुणीजन, इष्टमित्र, नातेवाईक, संस्थापरिचारक वगैरे मंडळी त्यांच्याकडे नेहमीं येत व त्या सर्वांचें आदरातिथ्य व संभावना त्यांच्याकडे यथाशक्ति होत असे. उपनिषद्कारिकेंत सांगितल्याप्रमाणें "मला पुष्कळ संपत्ति मिळो, माझ्या घरीं पुष्कळ लोक भोजनास येवोत, माझ्या हातून पुष्कळ अन्नशांती होवो व याप्रमाणें माझ्या संपत्तीचा उपयोग होवो" अशी त्यांची मनापासून इच्छा असे व तद्वत् त्यांचें आचरणही असे. सारांश त्यांच्या घराचा उपयोग रात्रंदिवस सर्वांस होत असे व हल्लींही होत आहे.

## परोपकार

परोपकार करण्याची त्यांना विलक्षण हौस असे. दुसऱ्यांनीं कांहींतरी उद्योगधंदा करून ऊर्जितावस्थेस यावें असें त्यांना नेहमीं वाटत असल्यामुळें ते पुष्कळांना भांडवलाकरितां पैशाची मदत करीत. त्यांत यश आल्यास त्यांना आनंद होई. धंद्यांत बूड आली व ती त्याच्या हलगर्जीपणामुळें आली नाहीं अशी खात्री झाल्यास पैसा वसुलीच्या कामीं तें त्याला कधींही त्रास देत नसत, अगर त्यावर फिर्यादही करीत नसत.

## माझा परिचय.

माझा व अण्णांचा आज ३० वर्षें परिचय व स्नेह असल्यामुळें आम्ही नेहमी एकमेकांकडे जातयेत. असूं. अम्ही पुष्कळ वेळां दूरदूरचे प्रवास केले. एके ठिकाणीं बसण्याउठण्याची, बोलण्याचालण्याची, खाण्यापिण्याची, निजण्यासवरण्याची पुष्कळ संधि आल्यामुळें व निकट सहवास झाल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं असलेल्या अनेक सद्गुणांची मला यथार्थ जाणीव झाली.

## आमचा प्रवास.

आम्ही प्रथमतः श्रीक्षेत्र शैलधी ( शिर्डी ) येथें सन १९१० सालीं श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा महाराजांच्या दर्शनास गेलों. त्या वेळीं आमच्याबरोबर डहाणू तालुक्यांतील निकावली गांवचा कावजी पाटील कोळी हा होता. शिर्डीस ३-४ दिवस राहून तेथून आम्ही श्री. कुळकर्णीमहाराजांच्या दर्शना-करितां पारनेरास गेलों. त्यांचें दर्शन घेऊन पुण्यास येऊन श्रीजगदंबा पर्वतीदेवीचें दर्शन घेतलें. नंतर तेथून श्रीक्षेत्र आळंदी येथें जाऊन भगवान श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचें दर्शन घेतलें. नंतर श्री क्षेत्र कवाड येथें जाऊन श्री समर्थ सद्गुरु सखाराम महाराजांच्या समाधीचें दर्शन घेतलें. नंतर श्री समर्थ संतवर्य नारायण महाराज केडगांवीं नसून मुंबईंत आहेत असें समजल्यावरून मुंबईस जाऊन त्यांचें दर्शन घेतलें. त्यानंतर आण्णा व मी पुष्कळ वेळां शिर्डीस श्रीबाबांच्या दर्शनास गेलों. एक वेळ आम्ही श्रीक्षेत्र नेवासें येथें जाऊन सर्व जगताचें जीवनसूत्र असें जे श्री मोहनीराज ( महा-लया किंवा अर्धनारी नटेश्वर ) यांचें दर्शन घेतलें. पुढें कांहीं वर्षांनीं श्री नर्मदा तटावरील श्रीक्षेत्र गरुडेश्वरीं जाऊन श्री समर्थ टेंभे स्वामीमहाराज यांचें दर्शन घेतलें व शेवटीं म्हणजे सुमारें ४-५ वर्षांपूर्वीं श्रीक्षेत्र द्वारकापुरी, सुदामपुरी ( पोरबंदर ) प्रभासपट्टण ऊर्फ सोरटी सोम नाथ वगैरे तीर्थयात्रा करून आण्णा सहकुटुंब व जामात श्री. बाबूराव जोशी यांच्यासह मातृगये-करितां श्री सिद्धपूरला गेले व मी सहकुटुंब व इतर दुसऱ्या मंडळीसह ठाण्यास गेलों.

## श्री लक्ष्मी-नारायण.

डहाणू येथील श्री लक्ष्मी-नारायणाचें मंदिर सुमारें १२५-१५० वर्षां-पूर्वीं आण्णांच्या वडिलांच्या मामांनीं बांधिलें. या लक्ष्मी-नारायणावर आण्णांची विलक्षण व अप्रतिम भक्ति असे. या देवस्थानास सरकारांतून थोडीशी वार्षिक नेमणूक आहे; परंतु तेवढ्यांत पुजाऱ्याचें भागत नसल्यामुळें पुजाऱ्याचा बाकीचा सर्व खर्च आण्णाच करीत व हें देवस्थान अव्याहत व निरंतर

चालावें म्हणून त्यांनीं त्या देवास आपल्या जमिनीपैकीं कांहीं जमिनीचें उत्पन्न लावून देण्याचें लिहून ठेविलें आहे. आण्णांच्या मागें त्यांचे आज्ञाधारक चिरंजीव आण्णांची ही सदिच्छा पुरी करतीलच.

## शिर्डी संस्थाननिधीस मदत.

आण्णांची श्री समर्थ सद्गुरु संतचूडामणी साईबाबांवरही फार भक्ति असे. मजबरोबर ते पुष्कळ वेळां शिर्डीस येत असत, हें वर लिहिलेंच आहे. श्री साईलीलेंत वेळोवेळीं सूचना केल्याप्रमाणें ते अलिकडील प्रत्येक लग्नकार्यांत व विशेषप्रसंगीं बाबांची दक्षिणा मुद्दाम आठवणीनें काढून ठेवून ती मजकडे पाठवून देत व मी ती शिर्डीसंस्थानच्या खजिनदाराकडे रवाना करीत असें.

आपल्या चि॰जीवांच्या ( श्रीरामकृष्ण जनार्दन ) नांवावर १०० रुपये वर्गणी भरून त्यांनीं चिरंजिवास शिर्डी संस्थानचे तहाहयात सभासद करून ठेविलें आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं श्रीयुत केसूनाना ( केशव महादेव ) करंदीकर व श्रीयुत हरिभाऊ कर्णिक वगैरे मंडळीकडून प्रत्येकीं १०० रुपये वसूल करून शिर्डी संस्थानकडे पाठविले आहेत.

आण्णा श्री सा॰लीला मासिकांचे प्रथमपासून वर्गणीदार होते व हल्लीं त्यांचे चिरंजीव श्रीयुत रामकृष्णपंत तात्या हेसुद्धां वर्गणीदार असून त्यांनीं तें चालू ठेविलें आहे व पुढेही नेहमीं चालू ठेवतील अशी माझी पूर्ण खात्री आहे.

कै. श्री. नानासाहेब चांदोरकर यांच्या घरीं कल्याण येथें असलेल्या श्री दासगणू महाराजांनीं लिहिलेल्या श्रीभक्तलीलामृत व श्रीसंतलीलामृत या ग्रंथांच्या पोथ्या कसरीच्या भक्षस्थानीं पडत असलेल्या भक्त मंडळीस विकून त्यांचे पैसे वसूल करण्याच्या कामी आण्णांनीं अत्यंत परिश्रम करून अजमासें १५० रुपये श्रीनानासाहेबांच्या दोघां चिरंजीवांच्या संमतीनें श्री शिर्डी संस्थान कायमनिधीकरितां संस्थानचे खजिनदारांकडे पाठवून दिले. ते संस्थानच्या कायमनिधीकरितां हस्तें परहस्तें नेहमीं पुष्कळ मदत करीत.

## गुप्तभक्त.

आण्णा हे श्रीबाबांचे गुप्तभक्त होते. आपल्या घरीं बाबांची छबी ठेवून ते तिची नित्यनेमानें पूजा करीत, व सायंकाळीं नित्यनेमानें मुलांकडून तिची आरती करून घेत.

श्रीबाबांची त्यांच्यावर कृपा असे. सुमारें ४–५ वर्षांपूर्वीं आण्णांचे जामत श्रीकेशव गणेश ऊर्फ बाबूराव जोशी ज्ञानसागर लिथो छापखान्याचे मालक यांनीं स्वतःच्या उपयोगाकरतां मुंबईच्या एका चित्रकाराकडून श्री काकासाहेब महाजनी मार्फत बाबांची मोठया आकाराची छबी तयार करवून तिला सुबक चौकट बसवून मुंबईस स्वतःच्या बिऱ्हाडीं आणून ठेविली. त्या दिवशी मी श्री बाबूरावांबरोबरच होतो. म्हणून ती तसबीर माझ्या पूर्ण ध्यानांत होती. पुढें कांहीं महिन्यांनीं मी डहाणूस गेलों तेव्हां तीच तसबीर मी आण्णांचें घरीं पाहिली. ही बाबूरावांची तसबीर येथें कशी आली म्हणून आण्णांस विचारतां "मला डहाणूस नेऊन पोंचव" असा दृष्टांत बाबूरावास झाल्यावरून त्यांनीं ही तसबीर येथें आणून ठेविली आहे, असें त्यांनीं मला सांगितलें. बाबूरावांस याबद्दल सखेदाश्चर्य वाटलें; पण करणार काय ? बाबांच्या आज्ञेप्रमाणें करणें भाग पडलें. तेव्हांपासून ती छबी आण्णांच्याच घरीं आहे. काय हें श्री बाबांचें आण्णांवरील प्रेम! कीं जो जगदीश परमात्मा स्वतः होऊन आण्णाकडून सेवा घेण्याकरितां छबी रूपानें त्यांचे घरीं आला !

श्री बाबांची सेवा घडावी म्हणून कित्येक भक्तांनीं चांदीच्या किंवा लांकडाच्या पादुका तयार करवून किंवा श्री विष्णुसहस्रनाम व श्रीमद्भागवतादि परमपूज्य पुराण ग्रंथ मुद्दाम विकत घेऊन त्या पादुका किंवा ते ग्रंथ बाबांनीं आपल्यास प्रसाद म्हणून सेवा करण्यास द्यावे म्हणून बाबांच्या हातांत दिले असतां त्या पादुका किंवा ते ग्रंथ बाबांनीं त्यांना न देतां तिसऱ्याच इसमास दिले आहेत. ( श्री. साईसच्चरित अ. २७ यांतील श्री. काका महाजनी, श्री. रामदासी व श्री. माधवराव देशपांडे यांच्या कथा पाहा. )

खरोखरच आण्णांची जबरदस्त पूर्वपुण्याई म्हणूनच वरील गोष्ट घडून आली. नाहींतर काळत्रयींही घडती ना. हा एक अपूर्व योगच समजला पाहिजे.

## दक्षिणा.

याच्याच उलट गोष्ट म्हणजे श्री बाबा हे आण्णांची उत्कटेच्छा असतांही आण्णांच्या जवळ कधींही दक्षिणा मागत नसत, हें मी स्वतः पाहिलें आहे. माझी देण्याची इच्छा असतां बाबा मजजवळ दक्षिणा कां मागत नाहींत म्हणून आण्णा मला प्रत्येक वेळां विचारीत. बाबा अमुक गोष्ट कां करतात व अमुक गोष्ट कां करीत नाहींत, हें कोण सांगणार ! ते विश्वांतरव्यापी आहेत. कोणाकडून काय व कशी सेवा घ्यावयाची हें त्यांचें त्यांनाच माहित. आपल्यासारख्या पामर जीवास त्यांची कृति व लीला अगम्य आहे. सेवेचीं अंगें नानाविध आहेत. दक्षिणा हीच सेवासर्वस्व आहे असें नाहीं. तुमच्याकडून दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारची सेवा घ्यावयाची असेल अथवा तुमच्याकडून पुढें दक्षिणा द्रव्यरूपांत अथवा अन्य स्वरूपांत घ्यावयाची असेल म्हणून बाबा हल्लीं तुमच्या कडून दक्षिणा मागत नसतील. आपल्याला जोंपर्यंत उच्च दृष्टि आली नाहीं तोंपर्यंत आपल्या स्वैर मनोवृत्तीनें बाबांच्या संबंधानें या बाबतींत कोणत्याही प्रकारचा निश्चित सिद्धांत न काढणें हें बरें, असें मी त्यांना सांगें.

आण्णा, कावलीचा कावजी पाटील व मी असे तिघे जण प्रथम १९१० सालीं श्रीक्षेत्र शिर्डीस बाबांच्या दर्शनास गेलों हें वर लिहिलेंच आहे. त्या वेळीं बाबांच्या पुण्य व पवित्र चरणांचें दर्शन घेऊन पूर्वसंकेतानुरूप त्यांना मी अत्यादरपूर्वक एक रुपया दक्षिणा दिली. तिचा कृपेनें स्वीकार करून त्यांनीं मजजवळ आणखी दोन रुपये दक्षिणा मागितली. मी ती अत्यानंदपूर्वक प्रेमभावानें दिली. नंतर आण्णांनीं अति विनत भावानें व श्रद्धायुक्त अंतःकरणानें एक रुपया दक्षिणा श्रीसमर्थ बाबांना अर्पण केली. तिचाही बाबांनीं कृपेनें स्वीकार करून आण्णांजवळ आणखी एक रुपया अधिक मागितला. आण्णांनीं तो त्वरित मुदितवृत्तीनें दिला. कावजी पाटलास जवळच येऊं

दिलें नाहीं. मग दक्षिणेची गोष्टच कशाला विचारावी ! या बद्दलची विस्तृत ही हकीकत श्री साईलीलेच्या चवथ्या वर्षाच्या पहिल्या व दुसऱ्या अंकांत " श्री कावजी लीलाख्यान " यांत दिली आहे. असो. या वेळीं श्री बाबांनीं आण्णांपासून २ रुपये घेतले व मजकडून ३ रुपये घेतले, याचा अर्थ काय म्हणून ?

## उपासना.

बाबांचे सर्वांत जुने विद्वान एकनिष्ठ परम भक्त व बाबांच्या बोलण्याचा अर्थ करण्यांत पटाईत कै. नानासाहेब चांदोरकर त्या वेळीं असलेले डहाणू प्रांताधिकारी यांना त्यांचा मुक्काम डहाणू अथवा बोइसर येथें असतांना बाबांचें दर्शन घेऊन येतांच विचारला. नानासाहेबांनीं त्याचा अर्थ असा केला .कीं, बाबांनीं आण्णांना द्व्यक्षरी उपासना दिली किंवा त्यांची पूर्वीपासूनची द्व्यक्षरी उपासना असल्यास तीच या रूपानें कायम केली. आण्णांची उपासना द्व्य-क्षरीच होती व नानासाहेबांनीं सांगितलेला दोन रुपये दक्षिणेचा अर्थ आण्णांना पटला. व त्यांची द्व्यक्षरी उपासना कोणती होती तीही त्यांनीं नानासाहेबांना व मला तेथेंच सांगितली. पूर्वी कोणी कोणाची उपासना घेतली असल्यास अगर कोणास नवीन सांगावयाची असल्यास ती त्यास निरनिराळ्या सांकेतिक खुणेंत सांगून सर्व उपासनादैवतांत मीच आहें, अशी त्यांची खात्री पटवून देण्याची बाबांची एक अद्भुत व अतर्क्य शैली असे.

आण्णा वयातीत झाले असल्याकारणानें अलीकडे त्यांच्यानें एकटें बाहेर पडवत नसे. परगांवीं जाण्याच्या वेळीं ते कोणीतरी दुसरा सम बरोबर घेत.

## महायात्रा.

श्रीकाशीयात्रेस मजबरोबर जाण्याची त्यांची मनापासून इच्छा होती व सन १९२३ सालीं मी सहकुटुंब काशीयात्रेस गेलों त्याच वेळेस ते मजबरोबर येणार होते; परंतु एप्रिल हा ऐन उन्हाळ्याचा महिना असल्यामुळें व काशी-कडे तर त्या वेळीं फारच उष्णता असल्यामुळें इतकी कडक उष्णता आपल्या

डोळ्यांस सोसणार नाहीं असें वाटून त्यांनीं त्या वेळचा बेत रहीत केला; परंतु त्यांच्या उत्कटेच्छेनें पुन्हां उचल खाल्ल्यानें व त्यांचे जामात श्रीयुत गोविंदराव वाड, कन्या सौ. ताईबाई व चिरंजीव श्री. मधुसूदनराव (बाबा) या त्रिवर्गांनीं त्यांना सांभाळून नेऊन सांभाळून परत आणण्याची आग्रहपूर्वक खात्री दिल्यामुळें त्यांचे काशीच्या यात्रेचा योग पुन्हां आठ वर्षांनीं जुळून आला. प्रयाग, काशी व गया ही त्रिस्थळी यथाविधि करून ते देहावमनापूर्वी सुमारें १५ दिवस अगोदर घरीं परत आले.

## अंतकाळ.

घरीं परत आल्यावर त्यांना एकदोन दिवस बरें वाटलें; पण पुढें रोज थोडथोडा ताप येऊं लागला. हा ताप सारखा १४ दिवस आला व त्यांतच त्यांचा अंत झाला.

काशीयात्रेहून परत आल्यावर एकमेकांच्या भेटीची एकमेकांस अंत:-करणपूर्वक उत्कटातुरता होती; परंतु त्यांच्या या १४ दिवसांच्या विषमज्वराची मला यत्किंचित्‌ही वार्ता नसल्यामुळें व घरांत फार अडचण असल्यामुळें मी तूर्त थोडे दिवस डहाणूस येण्याचें लांबवावें असें मला त्यांच्याचकडून मन:कष्टतेनें लिहिलेलें सूचना कार्ड आलें असल्यामुळें, आपल्या देहविसर्जनानंतर आण्णा ४ वर्षें मागे राहातील असें ति. सौ. वहिनीसाहेब ( आण्णांचे द्वितीय कुटुंब ) यांनीं त्यांच्या देहावसानासमयीं भविष्य सांगून ठेविलें असल्यामुळें व माझ्या स्वत:च्या आजारीपणामुळें त्यांची व माझी आण्णांच्या देहावसानकालीं भेट झाली नाहीं, याबद्दल कल्पनातीत दु:ख होतें. उभयतांची तीव्र आतुरता असतांही भेट होऊं नये हेंच माझें परम दुर्भाग्य ! खरें आंतवैरित्व तें हेंच ! दुर्दैव-कुटिलता ती हीच ! हतविधीची दुष्ट लीला ती हीच ! असो. झाली गोष्ट ती झालीच. होणार तें सर्व ऋणानुबंधानुसारच होणार. आतां मनास कितीही उद्विग्नता उत्पन्न झाली तरी त्याचा उपयोग काय ? विधिघटना विचित्र आहे. कालगती वक्र आहे.

## माझी व त्यांची शेवटची भेट.

आण्णांची, माझी व माझ्या घरांतील सर्व मंडळीची अखेरची भेट ता. १२ फेब्रुवारी १९३१ रोजीं ठाणें येथें झाली. माझ्या दोन्हीं मुलांचीं लग्नें ता. १० व १२ फेब्रुवारी १९३१ रोजीं ठाणें येथें झालीं व त्या दोन्हीं लग्नास ते प्रेमपूर्वक दोन्हीं नूतन वधुवरांस आशीर्वाद देण्यास शरीरकष्ट सोसूनही मुद्दाम आले होते. हेंच आमचें सर्वांचें मी महद्भाग्य समजतों.

## कौटुंबिक सौख्य.

स्वार्थ, परमार्थ, गृहस्थाश्रमाचें योग्य परिपालन, शेतीवाडी, नोकरचाकर, गुरेंढोरें, गाडीघोडीं, व्यापारधंदा, कुटुंब, पुत्रपौत्र, प्रपौत्र, तीर्थयात्रा, संतदर्शनें, कुटुंब निवर्तल्यावर थोडयाच काळांत आपल्या स्वतःच्या वास्तूंत आपल्या मुलांबाळांत सौख्याचें मरण, इत्यादि सर्व गोष्टींची अनुकुलता व पूर्ण कौटुंबिक सौख्य या जगतितलावर ज्या थोडयाच भाग्यशाली पुरुषांना लाभतें त्यापैकींच आण्णा हे एक होते,असें म्हणण्यास तिळप्राय प्रत्यवाय नाहीं.

आण्णांना चार चिरंजीव व पांच कन्या आहेत. सर्वांत कनिष्ठ चिरंजीव श्री. दत्तात्रय खेरीज करून सर्व मुलांचे व मुलींचे विवाह झाले आहेत. आण्णांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. आत्मारामपंत ऊर्फ आपासाहेब हे बी. ए., एल्.-एल्. बी., असून त्यांचा वकिलीचा धंदा उत्तम चालला आहे. आण्णाप्रमाणें त्यांनाही सार्वजनिक कामाची हौस असून ते या टापूंतील बहुतेक सर्व सार्वजनिक कामांत पुढाकार घेऊन जनसेवा करतात. ठाणें जिल्हा बोर्डांत त्यांनीं प्रशंसनीय कामगिरी केली आहे व अजूनही करीत आहेत. आपासाहेबांस तीन चिरंजीव व तीन दुहिता आहेत. आपासाहेबांचे वडील चिरं- श्री. रघुनाथराव हेही 'एल् एल्. बी., असून विवाहित आहेत व त्यांना एक मुलगा आहे.

## आण्णांचा कुटुंबविस्तार.

अण्णांचे द्वितीय चिरंजीव श्री. रामकृष्णपंत तात्या हे ॅट्रिक असून

वडिलांप्रमाणें घरची सर्व व्यवस्था, शेतवाडी व उद्योगधंदा पाहातात. त्यांना दोन मुलगे व दोन मुली आहेत.

आण्णाचे तिसरे चिरंजीव श्री. मधुसुदनराव ऊर्फ बाबा हे मुंबईज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयुटचे ग्रॅज्युएट असून मुंबईस एजन्सीचा धंदा करतात. यांना एक मुलगा आहे.

चवथे चिरंजीव श्री. दत्तात्रय हे लहान वयाचे असून शाळेंत शिकत आहेत.

## दोन काशीयात्रा.

वरील हकीकतीवरून आण्णांना दोन काशीयात्रा घडल्या. एक प्रपौत्र दर्शनाची घरच्यां घरींच व दुसरी, प्रत्यक्ष श्री विश्वेश्वर दर्शनाची श्री वाराणसी क्षेत्रांत.

## भाग्यशालित्व व पुण्याई.

आण्णांचे सर्व चिरंजीव त्यांच्या आज्ञेंत असून त्यांना विचारल्यावांचून कोणतीही गोष्ट करीत नसत. मरेपर्यंत आण्णा परस्वाधीन नव्हते. त्यांचें वजन व दरारा सर्वांवर होता. शेवटच्या क्षणापर्यंत ते सावध होते. याप्रमाणें व्यवहारांत उत्तम लौकिक संपादन करून व परमार्थांत सुंदर प्रगति करून आण्णांनीं आपली संसारयात्रा संपवून ते कायमचे श्री समर्थ सद्गुरु साईराज पदकमलीं लीन झाले. या भूतलावर यापेक्षां दुसरें परमभाग्यशालित्व व मधुरपुण्याई ती कोणती? !

## आशा

आण्णांचे सर्व चिरंजीव विद्वान, उत्साही, सद्गुणी, निरभिमानी, परोपकारी, मनमिळाऊ व कर्तृत्ववान आहेत. त्यांनीं एका विचारानें राहून आजपर्यंत जसा आपल्या परमपूज्य वडिलांचा लौकिक संभाळला तसाच त्यांत जास्त भर घालून तो पुढेंही संभाळतील व वडिलांचें गृहस्थाश्रम परिपालनव्रत तसेंच पुढें चालवितील अशी बलवती, आशा आहे.

## प्रार्थना

शेवटीं आण्णांच्या कुटुंबांतील सर्व आबालवृद्ध मंडळींना नित्याभिष्ट व धवलयश चिंतन करून त्यांना जगदीश परमात्मा सदा सुखी व आनंदी ठेवून दीर्घायुषी करो व आण्णांच्या विशुद्ध व पूज्य आत्म्यास परमगती देवो अशी त्या अत्यंत मांगलिक, जगच्चालक, जगत्पालक, जगन्मालक प्रभु श्रीसमर्थ सद्गुरु बाबांच्या दिव्य चरणसरोरुहीं करद्वय जोडून साष्टांग प्रणिपात व अत्यादर-पूर्वक शुद्धांतः करणानें व नितांत विनत भावानें प्रार्थना करून हा बराच लांबलेला लेख संपवून त्याच सद्गुरूंच्या पुण्यांघ्रि युगुलीं वाक्पुष्प म्हणून समर्पण करतों.

## भुजंग प्रयातम्

त्यजासक्ति माशु स्वदेहे कुपात्रे ।
स्वपुत्रे, कलत्रे, तथा राज्यछत्रे ।
रमस्व प्रियश्रीश साईचरित्रे ।
विचित्रे, पवित्रे, चिदानंद शास्त्रे ॥

## अर्थ

हे मानवा, नानाप्रकारच्या दोषांनीं भरलेल्या या देहावर, पुत्रावर, स्त्रीवर त्याच प्रमाणें राज्यछत्रावर असलेली आसक्ती लवकर सोडून दे. आणि ज्ञान व आनंद यांचें शास्त्रच असें जें पावन, अद्भुतप्रिय लक्ष्मीकांत श्री साईबाबांचें चरित्र त्या ठिकाणीं रममाण हो.

मल्यापु
वैशाख कृ. ११
शके १८५३

**संतचरणरज दासानुदास**
**बाबांचें बाळ.**

# श्रीयुत शेट फिरोजशहा होर्मसजी यांच्या अनुभवावर सुचलेले विचार.

कृ. शि. सा. न. वि. वि.

मुंबापुरस्थ पारशी शेट श्रीयुत फिरोजशहा होर्मसजी पदमजी यांनीं सन १९१७ सालीं म्हणजे १४ वर्षांपूर्वी विश्वांतर साक्षी श्री साईबाबा संबंधानें त्यांना जो प्रत्यक्ष अनुभव आला. व जो त्यांनीं ता. १५-३-३१ रोजीं सांताक्रुसनिवासी रावबहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांना मुद्दाम त्यांच्या घरीं येऊन सांगितला व जो आपण श्रीसाईलीला मासिकाच्या ८ व्या वर्षाच्या १-२ या जोड अंकांत नुकताच प्रसिद्ध केला, त्यासंबंधानें सुचलेले विचार खाली देत आहे.

फिरोजशहा शेटचे वडील बाबांचें दर्शन घेऊन बाबांचा फोटो बरोबर घेऊन शिरडीहून परत मुंबईस आले. फिरोजशहा त्या वेळीं विद्यार्थी होते व ते म्हणाले, असे साधु पुष्कळ असतात, त्यांत खरेंखोटें कसें ओळखावें ! बाबांनीं त्याच रात्रीं दृष्टांत देऊन फिरोजशहास सांगितलें कीं, तुझ्या वडिलांनीं टेबलावर ठेविलेला माझा फोटो तूं सकाळीं उचलून पाहा. तूं उचलूं शकलास तर मी खोटा साधु व उचलूं न शकलास तर मी खरा संत.

बाबांचा फोटो तो कितीसा मोठा असणार ? पण तो फिरोजशहा शेट आपलें सामर्थ्य सर्वस्व खर्च करूनही उचलूं शकले नाहींत. फोटो टेबलावर ठेविला होता. फोटोसह सर्व टेबल उचललें गेलें, परंतु टेबलावरील सुटा फोटो स्वतंत्र व अलग रीतीनें उचलला गेला नाहीं. काय ही अद्भुत लीला व प्रचंड सत्ता ! !

वैदिक वाङ्मयाच्या तृतीय म्हणजे ज्ञानकांडांत अशीच एक सुंदर आख्यायिका आलेली आहे. तिचें स्मरण झाल्यावरून ती संस्कृत आख्यायिका व तिचा मराठी सारांश खालीं देत आहे.

ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयंत, त ऐक्षन्ता स्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति ॥ १४ ॥ तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव तन्न व्यजानत किमिदं यक्षमिति ॥ १५ ॥ तेऽग्निम ब्रुव-न्जातवेद एतद्विजानी हि किमेतद्यक्ष मिति तथेति ॥ १६ ॥ तदभ्यद्रवत्तम भ्यवदत्को सीत्यग्निर्वा अहमस्मीत्य ब्रवीज्जातवेदा वा अहमस्मीति ॥१७॥ तस्मि न्स्त्वयि किं वीर्य मि त्यपी दन्ँ सर्वं दहेयं यदिद पृथिव्यामिति॥१८॥ तस्मै तृणं निदधावेतद्दहेति तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाक दग्धुं सतत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥ १९ ॥ अथ वायुमब्रुवन्वायवेतद्विजानीहि किमेद्यक्षमिति तथेति ॥ २० ॥ तदभ्यद्रवत्तमभ्यवदत्कोऽसीति वायुर्वा अहमस्मी-त्यब्रवीन्मातरिश्वा वा अहमस्मीति ॥ २१ ॥ तस्मिन् स्त्वयिकिं वीर्यमित्यपीदँ सर्व माददीय यदिदं पृथिव्यामिति ॥ २२ ॥ तस्मै तृणं निदधावेतदादत्स्वेति तदुपप्रेयाय सर्व जवेन तन्न शशाकाऽऽदातुं सतत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥२३॥ अथेंद्रमब्रुवन्मघवन्नेतद्विजानी हि किमेतद्यक्षमिनि तथेति तदभ्यद्रवत्त स्मात्तिरोदधे ॥ २४ ॥ सतस्मिन्नेवाऽऽकाशे स्त्रियमाजगाम बहुशोभमानामुमाँ हैमवतीं ताँ होवाच किमेतद्यक्षमिति ॥ २५ ॥ सा ब्रम्हेति होवाच ब्रह्मणो वा एतद्विजये महीयध्वमिति ततो हैव विदांचकार ब्रम्हेति ॥ २६ ॥

## मराठी सारांश.

पूर्वी देवदानव युद्धामध्यें जग स्थितिपरिपालनेच्छेनें परमात्माज्ञानुसार वर्तन करणाऱ्या लाभार्थी देवांनीं स्वलाभार्थ असुरांचा पराभव केला, व पर-मात्म सत्तेनेंच त्यांना जय मिळाला. परमात्म्या वस्तूच्या अस्तित्वाबद्दल, सत्यते-बद्दल, ऐश्वर्याबद्दल व अंतर्साक्षित्वाबद्दल भयंकर अज्ञान असल्यामुळें, हा जो जय मिळाला हा आमच्याच सामर्थ्यानें मिळाला, असा मिथ्या अभिमान देवांना झाला व हा जो मोठेपणा आम्हांस मिळाला आहे तोही आमच्या अतुल सामर्थ्याचें फळ होय असें त्यांना वाटलें; परंतु परमात्मास ही गोष्ट कशी खप-णार ? देव अज्ञानांत बुडाले, स्वहितास मुकले, वृथाभिमानास बळी पडले असें

पडून त्यांचा अभिमान नष्ट करावा व त्यांचें कल्याण करावें या उदात्त हेतूनें, परमात्मा, एका अंतरालस्थ यक्षाचें स्वरूप धारण करून अंतरालांत अत्यंत तेजस्वी दैदिप्यमान सौदामिनी ( विद्युल्लता ) प्रमाणें चमकूं लागले.

ही बातमी हां हां म्हणतां सर्व स्वर्ग लोकांत पसरली व हें अद्भुत सत्व कोण आहे व याचा अवतार कशाकरितां आहे याचा उलडा कोणासच होईना. सर्व देव इंद्राकडे गेले व त्यांनीं ही बातमी इंद्राच्या कानावर घातली. अमर नृपति इंद्रानें त्या सत्वाचें ज्ञान करून घेण्याकरितां सर्व शक्तिमान व निमिषमात्रांत ब्रह्मांड दग्ध करून टाकणाऱ्या जातवेद अग्नीस तिकडे पाठविलें. तूं कोण आहेस म्हणून त्या सत्वानें त्यास विचारतां मी विश्वदग्ध करणारा आहें, अशा गर्वोक्तीचें उत्तर दिलें. परमात्मांनीं त्याच्या पुढें एक लहानशी गवताची काडी टाकिली व ही जाळ, अशी आज्ञा केली. आपला अपमान झाला असें अग्नीस वाटलें, पण त्या सत्वाची आज्ञा उल्लंघन करणें शक्य नव्हतें. शक्तीसर्वस्व खर्च करून काडी जाळण्याचा भगीरथ प्रयत्न अग्नीनें केला. पण काडी जाळूं शकला नाहीं. अग्नी हिरमुष्टी झाला व म्लानवदन करून त्यानें आपल्या पराजयाची हकीकत आपल्या अधिपतीस सांगितली. अमर भूपतीनें नंतर मातरिश्वा वायूस पाठविलें. परमात्मानें त्यास विचारलें तूं कोण, तो म्हणाला ! सर्व विश्वाला निमिषमात्रांत इकडून तिकडे फेकून देणारा मी प्रभंजन आहें. बरें तर ही येवढी गवताची काडी उचलून फेंकून दे, असे म्हणून त्याच्यापुढें अग्नीसमोर जाळण्याकरितां ठेविलेली तीच काडी ठेविली असें सांगण्यांत आपलाही अपमान झाला असें अग्नीप्रमाणें वायूसही वाटलें; पण करतो काय ? सत्वाज्ञा मानल्यावांचून गत्यंतर नाहीं. वायूनेंही आपलें बल स्वसर्व खर्च करून व काडी उचलण्याचा प्रयत्न केला, पण तोही ती काडी उचलूं शकला नाहीं. वायू खजिल झाला व लज्जेनें मान खालीं घालून त्यानें अग्नीप्रमाणें आपलीही फजिती झाल्याचें वृत्त अमरनाथास निवेदन केलें. शेवटीं सर्व देवांच्या आग्रहपूर्वक विनंतीवरून स्वतः इंद्र गेले. इंद्र त्या ठिकाणीं जाऊन पोंचतांच तें सत्य अंतरधान पावलें. अग्नीस व वायूस

निदान त्या यक्षरूप सत्वाचें दर्शन होऊन त्याचें व त्याचें बोलणें झालें, मला तेंही घडलें नाहीं यामुळें आपला भयंकर अपमान होऊन आपण परम हतभागी आहों असें इंद्रास वाटलें. व तो अतीशय खिन्न झाला; परंतु ज्या आकाशांत तें सत्व अंतरधान पावलें त्याच आकाशांत त्याचें श्रद्धापूर्वक ध्यान करीत तो तसाच उभा राहिला. इंद्र गलिताभिमान झालेला पाहून व त्याची त्या यक्षसत्वावर भक्ति पाहून परमात्माची अखंड सहचारिणी हेमालंकारमंडिता, जगन्मोहिनी, रुचिर स्वरूपा, उमारूपिणी विद्या त्याच आकाशांत प्रादुर्भूत झाली. तिला इंद्रानें विचारलें कीं, हें निरोधान पावलेलें यक्षसत्व कोण ? ती म्हणाली, तें परब्रह्म. तुम्हां देवा-असुरांच्या युद्धांत तुम्हांस निमित्तमात्र करून ज्यांनीं विजय मिळविला तो हा परमात्मा. त्याचा विजय व मोठेपणा असतां तुम्हीं वृथाभिमानानें तो विजय व तो मोठेपणा तुमचा आहे असें समजतां. उमावचनानें इंद्रादि देवांची खात्री झाली कीं, आपला अभिमान मिथ्या आहे. ही सर्व सत्ता त्या निर्गुण अदृश्य परब्रह्माची आहे.

वरील आख्यायिक विश्ववंद्य वेदमाउलीच्या शिरोभागीं अमोल रत्नाप्रमाणें प्रकाशमान होणाऱ्या दशोपनिषदांपैकीं केनोपनिषदातील आहे. ( तृतीय खंड मंत्र १४ ते २६ )

ही आख्यायिका वरील फिराजशहा शेट यांच्या अनुभवास तंतोतंत जुळत आहे. यावरून उपनिषद कालींच परमात्मा आपले प्रचंड व अद्भुत ऐश्वर्य प्रगट करून देवादिकांचा अभिमान गलित करीत असून त्यांचें कल्याण करीत असत असें नव्हे, तर हल्लींही या युगांत व प्रस्तुत कालीं निर्गुण अदृश्य व अगोचर परमात्मा आपलें जिवंत अस्तित्व, अगम्य ऐश्वर्य अतर्क्य सामर्थ्य, अद्भुत सत्ता. अमर्याद व्याप्ति आपलाच सगुणावतार संतचुडामणीं श्री बाबांच्या स्वरूपांत सिद्ध करून देऊन भक्ताच्या चिकित्सक बुद्धीस पटेल असा, अनुभव त्यास देऊन त्याचा अभिमान नष्ट करून त्याचें कल्याण करीत आहेत, ही चिरस्मरणीय व परमानंदनीय गोष्ट आहे.

फिरोजशहा शेट यांचा अनुभव आधिभौतिक चष्म्यानें प्रत्येक वस्तु पहाणाऱ्या आधुनिक, नास्तिक व वावदुक शिरोमणीसही परमात्म वस्तूच्या अस्तित्व सत्यतेबद्दल खात्री पटवून देण्यांत पुरेसा आहे. वेद अप्रमाण, स्मृती असत्य, पुराणें मिथ्या, शास्त्रें वृथा म्हणणाऱ्या विद्वान लोकांच्या डोळ्यांतही हा वरील अनुभव म्हणजे एकप्रकारचें झणझणीत अंजनच आहे. हल्लीं अंतरिक्षात जिकडे तिकडे विमानें फिरूं लागलीं, तेव्हां पूर्वींचे प्रभू रामचंद्र नृपतीकालचें पुष्पक विमान खरें, गेल्या फ्रान्स व जर्मनीच्या महायुद्धांत घातुक धुराचा उपयोग केला गेला तेव्हां पूर्वीचें धूम्रास्त्र खरें असें वाटूं लागलें. वरील फिरोजशहा शेटच्या अनुभवानें उपनिषद् कालच्या आख्यायिका खऱ्या आहेत अशी खात्री पटून त्या ग्रंथरत्नावर प्रेम जडून भक्तवृंद मिथ्याभिमानापासून मुक्त होऊन परमात्मतत्वीं लीन होतील, अशी त्या जगज्जनक संतविभूषण श्री बाबांच्या दिव्य चरण पुंडरिकीं उत्कट प्रेमभावानें प्रार्थना करून व तेथेंच हें वाक्सुमन साष्टांग प्रणामासह अर्पण करून सुचलेले विचार संपवितों.

मल्याण. मिती वैशाख कृष्ण
१३ शके १८५३.

बाबांचें बाळ.

खातरीनें वाटे मशीं । जा म्यां तुला सोडिलें ॥ ११५ ॥ तें ऐकतां हुजूरवचन । आनंदलें आप्पाचें मन । शिरडीकडे तोंड करून । नाचूं लागला आनंदें ॥ ११६॥ हे सायी महाराज कल्पद्रुमा । भक्त-जनांचे पूर्णकामा । वैराग्याच्या निवासधामा । केलीस कृपा माझे-वरी ॥ ११७ ॥ तेणें मी झालों धन्य । या जगामाजीं जाण । अब्रूचें केलें रक्षण । माझ्या तुवां पुण्यवंता ॥ ११८ ॥ आप्पा तेथून दुसरे दिशीं । परत आला शिरडीसी । नमून सायीपदासी । वर्तमान श्रुत केलें ॥ ११९ ॥ बोलले बाबा त्यावर । करता करविता पर-मेश्वर । भक्तासाठीं शारङ्गधर । जें न घडे तें घडवीतसे ॥ १२० ॥ पुढें एके समयास । नारायण कृष्ण पेणशास । दाखविलें चमत्का-रास । तें कथानक ऐका हो ॥ १२१ ॥ कांता तया पेणशाची । परम भाविक उदार मनाची । तिची इच्छा दर्शनाची । झाली असे बाबांच्या ॥ १२२ ॥ सती विनवी जोडून करा । हे मत्सौभाग्य भांडारा । हे मत्सौख्यनभींचे दिनकरा । माझी विनंति ऐका हे ॥ १२३ ॥ कर्णोपकर्णीं ऐकिली मात । शिरडी नामक ग्रामांत । बाबा सायी महा महंत । दर्शनायोग्य असती ॥ १२४ ॥ ह्मणून वाटतें माझ्या मनीं । चला त्या गावां लागुनी । लीन होऊं संत-चरणीं । आपण उभयतां प्राणेश्वरा ॥ १२५ ॥ पेणसे म्हणती त्यावरी । ऐक मद्वचना सुंदरी । शिरडी ग्रामा भीतरीं । कोणी न संत सुशीले ॥ १२६ ॥ तेथें एक मुसलमान । वेडापिसा आहे जाण । बळेंच ढोंग माजवून । जग लुटाया बैसला ॥ १२७ ॥ त्याचा मांडिला देव्हारा । या अज्ञ जनांनीं खरा । म्हणोन ऐके माझी गिरा । भलता हट्ट घेऊं नको ॥ १२८ ॥ जेथें मुळींच क्षारपण । तेथें मधुरता कोठून । बेगडाचें उत्तम सुवर्ण । होईल कां सांग कांते ॥ १२९ ॥ तूं न पडावें याचे भरी । तो शिरडी मधला भिकारी । तुकडे मागोन [illegible] ॥ १३० ॥ साध्वीचे चित्तीं तळमळ ।

परी लागलीसे प्रबळ । म्हणे कधीं अर्पीन भाळ । त्या महाराज पदीं मी ॥ १३१ ॥ पेणशे पुढें फिरत फिरत । आले शिरडी ग्रामांत । सर्वें कांता सद्गुणी शांत । नाम माई जियेचें ॥ १३२ ॥ पेणसे सरकारी कामीं गुंतले । तों साध्वीनें काय केलें । जावोनी आपुलें साधिलें । कार्य तेथवां दर्शनाचें ॥ १३३ ॥ सायी पदीं अर्पितां भाळ । निमाली मनाची तळमळ । समाधान झालें सकळ । कौतुकें सांगे पतीसी ॥ १३४ ॥ मीं गेलें दर्शनासी । तो खराच आहे पुण्यराशी । तुम्हीं नका निंदूं त्यासी । दर्शन घ्या हो साधूचें ॥ १३५ ॥ कांतेच्या आग्रहावरून । आले दर्शना कारण । तें महाराज बोलले गर्जोन । येऊं नका कोणी येथें ॥ १३६ ॥ धोंडा घेऊन हातीं । पुढें येतां मारीन म्हणती । मी आहें ढोंगी अती । माझें दर्शन घेऊं नका ॥ १३७ ॥ मी जातीनें आहें हीन । वेडा पिसा मुसलमान । तुम्हीं उच्चवर्णी ब्राह्मण । बाटाल दर्शन घेतांची ॥ १३८ ॥ ऐसें बोलतां तयासी । पेणसे विरघळले मानसीं । म्हणती हा असे ज्ञानराशी । त्रिकालज्ञ महाराज ॥ १३९ ॥ आम्हीं बोललों उभयतां । तें या कळलें तत्वतां । जैसी वाऱ्याची व्यापकता । तैसी यांच्या ज्ञानाची ॥ १४० पेणशांनीं विचार केला । लावून आपाचा वशीला । लाभ करूनी घेतला । सत्पुरुष दर्शनाचा ॥ १४१ ॥ यास लोटतां कांहीं दिन । काय घडलें वर्तमान । तें ऐका हो भाविकजन । श्रवणीं सादर बैसावें॥ १४२ ॥ एके दिनीं सहजगती । महाराज बोलले अप्पाप्रती । आज चोरटे निश्चितीं । आले आपल्या गांवांत ॥ १४३ ॥ या चोरांची तऱ्हा निराळी । घराचा विक्षोभ न करिती मुळीं । ऐनमालावरी सगळी । दृष्टी असे तयांची ॥ १४४ ॥ तो करूनी हरण । जाती सर्व घेऊन । चोरी करीतां न दिसती जाण । ऐसे महा बिलंदर ॥ १४५ ॥ त्यांची प्रथमतः होईल स्वारी । आज वेड्या तुझ्यावरी । यास्तव जा कांहींतरी । बंदोबस्त [illegible]

तार्थ या गोष्टीचा । अप्पासी न कळला साचा । पहारा बसवून भिल्लाचा । लौकिकी बंदोबस्त केला असे ॥ १४७ ॥ गल्लोगल्लीं फिरे गस्त । होतां एक प्रहर रात्र । जुलाब उलट्या अप्पाप्रत । होऊं लागल्या मरीच्या ॥ १४८ ॥ शरीर झालें अवघें गार । वांबें व्यापिलें पदकर । नासीक कळस साचार । झालासे वांकडा ॥ १४९ ॥ खोल-खोल डोळे गेले । नाड्यांनीं स्थान सोडिलें । लोक शोकाकुल झाले । पाहून स्थिति अप्पाची ॥ १५० ॥ कांता झाली घाबरी । पाहतां नवऱ्याची स्थिति खरी । धांवोन आली झडकरी । मशीदींत बाबांच्या ॥ १५१ ॥ महाराजांचे धरून पाय । रडूं लागली धाय धाय । बाबा माझा पतीराय । सोडूनियां चालला ॥ १५२ ॥ द्या हो उदी अंगारा । तेणें उतार पडेल जरा । सौभाग्य जहाज सागरा । नका बुडवूं महाराजा ॥ १५३ ॥ महाराज म्हणतो तियेशीं । नको करूं शोकासी जो जन्मला मृत्यू त्यासी । आहे येणार एके दिनीं ॥ १५४ ॥ मृत्यू जन्म ईश्वरी कळा । तोच उरला भरून सगळा । करूं गेलिया तो वेगळा । कांहीं नये हाताशीं ॥ १५५ ॥ कोणी न जन्मे मरे कोणी । पहा परी ज्ञान चक्षूनीं । तूंही न निराळी त्या पासोनी । येईल हें प्रत्यया ॥ १५६ ॥ जैशी बंडी झालिया जीर्ण । लोक देताती फेकून। किंवा नावडे ह्मणून । त्याग करिती तियेचा ॥ १५७ ॥ तैसे हें शरीर वसन । पांघरलासे बाळे प्राण । तो प्राण नारायण । अक्षय अभग निर्विकल्प ॥ १५८ ॥ ह्मणून अंगारे करूं नको । उगीच ठिगळे मारूं नको । आड त्याच्या येऊं नको । जाऊं दे त्यास मुक्कामा ॥ १५९ ॥ माझ्या आधींच अप्पानीं । बदलावया आपुला कफनी । केली तयारी त्या लागुनी । तूं आड येऊं नको १६० ॥ अप्पास मिळेल सद्गती । मोक्ष आला त्याचे हातीं । चर्मचक्षूंच्या आड निश्चितीं । होताहे तो होऊं दे ॥ १६१ ॥ ऐसें निरखून तियेसी ।

वेळानें ॥ १६२ ॥ दुसरे दिवशीं गांवांत । दोन तीन लागले लोक सत्य । अवघे झाले भयाभीत । विनवूं लागले सायीसी ॥ १६३ ॥ बाबा पोत खेळूं लागली मरी । ह्याचा विचार कांहीं तरी । करा तुह्मीं आमच्या नगरीं । असून काय उपयोग ॥ १६४ ॥ महाराज म्हणती त्याप्रत । जातील माणसें सात । या आपुल्या शिरडींत । मग न राहे मरी ती ॥ १६५ ॥ बोलके तैसें झालें सत्य । मेलीं माणसें अवघीं सात । केवढें बाबांचें सामर्थ्य । आधीच भाकित केलें तिचें ॥ १६६ ॥ आतां ऐका पुढील प्रकार । तुम्हीं श्रोते उदार धीर । दास गणू मी तुमचें पोर । बोबड्या शब्दें सांगतसें ॥ १६७ ॥ कोंड्या सुतार नामें एक । भक्त होता परम भाविक । त्यावरी बाबांचें प्रेम देख । होतें आगळें सर्वांहूनी ॥ १६८ ॥ बाबा म्हणती कोंड्यासी तुवां जावें खळवाडीसी । आग मधल्या गंजीसी । लागली ती विझवावया ॥ १६९ ॥ कोंड्या झाला घाबरा । खळ्यास गेला करून त्वरा । तेथें तपास करून पुरा । आलासे माघारी ॥ १७० ॥ बाबा उगीच कांहीं तरी । सांगून मजला त्रास भारी । दिधला दुपारच्या अवसरीं । पाय माझे पोळले ॥ १७१ ॥ बाबा म्हणती ऐक जरा । माझी नोहे असत्य गिरा । वळून पाहे माघारा । तो पहा धूर निघाला ॥ १७२ ॥ सुड्यांसी सुड्या लागल्या दाट । मधल्या सुडीनें घेतला पेट । गांवांत झाला बोभाट । पेटलीसे खळवाडी ॥ १७३ ॥ दिवस होता उन्हाळ्याचा । त्यांत समय दुपारचा । प्रभंजन सुटला जोराचा । प्रळयवातासमान ॥ १७४ ॥ कडकडा झाडें मोडती । छपरें गगनीं उडूं पाहती । वावटळीस नाहीं गणती । दुर्धर प्रसंग ओढवला ॥१७५॥ लोक अवघे घाबरले । साईबाबाकडे आले । घट्ट तयांचे पाय धरिले । रडूं लागले दीनवत् ॥ १७६ ॥ हे साईबाबा कृपारासी । आग लागली खळवाडीसी । आतां आमची गति कैसी । सांगा होईल महा-

ती अवघी जळाल्या जाण। अन्न न मिळेल आम्हांतें ॥ १७८ ॥ मुलें माणसें मरतील जाण । करूनियां अन्न अन्न । गुरेंही सोडितील प्राण । चाऱ्यावांचून दयाळा ॥ १७९ ॥ यासाठीं कांहीं तरी । उपाय सांगा झडकरी । तुम्ही साक्षात श्रीहरी । भूतभविष्य जाणते ॥ १८० ॥ त्या जनांच्या विनंतीसी । देऊनी मान पुण्यराशी । गेले त्वरें रक्ष्मासी । आग विझवाया कारणें ॥ १८१ ॥ गंजी जी होती पेटली । ती महाराजांनीं अवलोकिली । धार पाण्याची फिरविली । भोंवतालीं गंजीच्या ॥ १८२ ॥ ही एवढीच जळेल । दुसरीस न धक्का लागेल । हा अग्नीचा भाग सकळ । विझवूं नका कोणी इसी ॥ १८३ ॥ जैसें महाराज बोलले । तैसेंच पुढें प्रत्यया आलें । जन अवघे आनंदले । थोर महती बाबांची ॥१८४॥ अवघ्या गंजी शेजाऱ्च्या । रक्षण केल्या असती साच्या । अंमल आपुला अग्नीच्या । वरही ज्यांनीं चालविला ॥ १८५ ॥ सत्पुरुषांच्या आज्ञेंत । पंचभूतें वागती सत्य । सच्चिदानंद रमानाथ सेवे तिष्ठत जयांच्या ॥ १८६ ॥ अस्तमानाचे समयासी । मंडळी आली दर्शनासी । नानासाहेब पुण्यराशी । चिटणीस नगर जिल्ह्याचे ॥ १८७ ॥ चांदोरकर दर्शनास । गेले बाबांच्या मशीदीस । आपण होऊन तयास । महाराज बोलले तें ऐका ॥ १८८ ॥ हे माझे गुणनिधाना । गोविंदात्मज नारायणा । चांदोरकर कुलभूषणा । पहा हे लोक मतलबी ॥ १८९ ॥ आज या भागचंदाची । गंजी जळाली असे साची । पाठ पुरविली त्यानें आमुची । तोटा झाला म्हणोनी ॥ १९० ॥ लाभ हानी जन्ममरण । हें ईश्वराचे आधीन । परी हे कैसे अंधजन । विसरताती तयाला ॥ १९१ ॥ लाभ होतां आनंदावें । हानी होतां कां रडावें । माझें माझें म्हणावें अर्थ काय यांमध्यें ॥ १९२ ॥ गंजी कोठली मारवाड्यांची । ती मुळींच कडब्याची । उत्पत्ति ती तियेची । झालीसे

मेघांनीं । रवीनें अमृतकरांनीं । आणिलें त्या आकारा ॥ १९४ ॥ ऐसे याचे मालक तीन । पृथ्वी सूर्य सजल घन । हा माझें माझें म्हणोन । उगाच टिऱ्या बडवितसे ॥ १९५ ॥ ती अग्नीनें भक्षिली । सूर्याची सत्ता अधिक झाली । पृथ्वी बिचारी होरपळली । मात्र अग्नितापानें ॥ १९६ ॥ मेघासी याची दाद नाहीं । तो घमेंडानंदन पाही । चंचल सौदामिनी ठायीं । रममाण जाहला ॥ १९७ ॥ जे स्त्रियांशीं लंपट अती । असती । कीं मूढमती । ते कधीं ना जाणती । आपुल्या लाभ हानीतें ॥ १९८ ॥ तो त्यामुळें उगीच बसला । सूर्यानें कावा साधिला । भूमीपासूनी हिसकूनी नेला । माल आपुला म्हणोनी ॥ १९९ ॥ जगांत जितक्या वस्तु असती । त्यांची अशीच उत्पत्ती । मालक तियेचे निश्चितीं । नाहीं आपण सर्वदा ॥ २०० ॥ तूं तरी कांहीं सांग याला । हा उगीच करितो दुःखाला मघापासून त्रास दिला । यानें मला अनिवार ॥ २०१ ॥ एक्या हातीं ईश्वर देतो । सर्वेचि दुसऱ्या हातीं नेतो । प्राण सुखदुःखा-करण होतो । अज्ञान गांठीं म्हणोनियां ॥ २०२ ॥ जा शेटजी घरा स्वस्थ ॥ फायदा दुसऱ्या व्यापारांत । होईल तुमचा निश्चित । येईल नुकसान भरून हें ॥ २०३ ॥ ऐसा वर्षतां बोध घन । अवघे आनं-दले पूर्ण । चिटणीसांनीं केलें वंदन । सद्गदीत जाहले ॥ २०४ ॥ हे भक्त चकोर पूर्ण चंद्रा । हे अपरोक्ष ज्ञानाच्या समुद्रा । द्यावी मसी ज्ञान मुद्रा । जेणें अज्ञान निरसेल ॥ २०५ ॥ देव कोण कैसा असे । तो कोठें वसतसे । काय केलिया भेटतसे । हें सांगा मजप्रती ॥२०६॥ जग हें मुळींच नश्वर । मग कां करावा हा व्यापार । ह्याचें वर्म फोडोनी सत्वर । मजलागीं सांगावें ॥ २०७ ॥ ऐसें ऐकतां चिटणी-साचें । भाषण बोलले महाराज साचे । विवेचन ह्या गोष्टीचें । करीन पुढें एके दिनीं ॥ २०८ ॥ जैसे चांदोरकर भक्त पुरे । तैसेच गणेश विष्णु बेरे । त्यांचें कथानक आवडे । ...

॥ २०९ ॥ हे जिल्ह्याचे तपासणीदार । असती शेतकी खात्यावर । ते मुद्दाम शिरडीवर । आले दर्शन घ्यावया ॥ २१० ॥ बाबांचें करितां वंदन । बोलले ते त्यांकारण । तुम्हीं आतांच येथून । निघून जावें शीघ्रगती ॥ २११ ॥ वेळ थोडाहि करूं नका । क्षण एकही राहूं नका । भरधांव आपुला तांगा हांका । कोपरगांवा शीघ्र जावें ॥२१२॥ ठेवून विश्वास महाराज वचनीं । बेरे निघाले तेथोनी । त्यांच्या तांग्या मागोनी । येत होता दुसरा तांगा ॥ २१३ ॥ त्या दुसऱ्या तांग्यात । जे बसले होते गृहस्थ । ते बोलले बेऱ्याप्रत । थांबा आम्हां येऊं द्या ॥ २१४ ॥ तांगा चालवा हळूहळू । नका हरिणासारखे पळु । अजून आहे बहुत वेळू । स्टेशनावरी गाडीस ॥ २१५ ॥ बेऱ्यानीं न त्या मान दिला । तांगा भरधांव हांकिला । गोदाप्रवाह ओलांडिला । पोहोंचले असती स्टेशनासी ॥ २१६ ॥ मागोमाग ऐकिली मात । लुटला तांगा रस्त्यांत । चोरट्यांनीं लवणांत । कोपरगांव रस्त्यावरी ॥ २१७ ॥ मारहाण फार झाली । संपत्ती अवघी लुटोनी नेली । पोलीस मंडळी निघाली । तपासासी तयाच्या ॥ २१८ ॥ हें ऐकता अशुभवृत्त । बेरे म्हणती हे सद्गुरुनाथ । संकटांतूनी या पोराप्रत । तुम्हीं सत्य वांचविलें ॥ २१९ ॥ एक हिरण्यकेशी ब्राह्मण । वाशिष्टगोत्री ज्ञान संपन्न । जयाचें तें वसती स्थान । पुण्यपट्टण जाणा हो ॥ २२० ॥ तो असे थोर अधिकारी । श्रीमान सदय अंतरीं । निष्ठा ब्रह्मकर्मावरी । जयाची ती अत्यंत ॥ २२१ ॥ म्हणे घ्यावें धाराग्र । परी कांता पावती मरण । कांतेचियां वांचून । अग्निहोत्र कैसें घडे ॥ २२२ ॥ पोटीं नसे संतती । घरीं अगणित संपत्ती । लग्न कराया मेघे मती । पन्नासीं भरलो म्हणूनियां ॥२२३॥ त्यास म्हणती कित्येक जन । करा हो तुम्हीं दुसरें लग्न । प्रयत्नांतीं नारायण । पावतो ऐसें शास्त्र ॥ २२४ ॥ बागाईताची मनीं आस ।

॥ २२५ ॥ म्हणून आमुची प्रार्थना । साहेब आपण मनीं आणा । वधु पाहून सुलक्षणा । लग्न करून घ्यावें हो ॥ २२६ ॥ तैं ते म्हणती हरीपंत । आतां संततीची आस व्यर्थ । हांसू मात्र जगतांत । होईल लग्न करतांच ॥ २२७ ॥ वयास आली पन्नासी । म्हातारपणीं संततीसी । पाहीन ऐसा पुण्यराशी । मी नव्हें हो खचीत ॥ २२८॥ जरी एकादा सांगेल संत । मशीं लग्न करण्याप्रत । तरी लग्नाचा योग सत्य । घडून येईल निश्चयें ॥ २२९ ॥ ऐसें बोलून जनासी । हरीपंत आले शिरडीसी । जातां सायीदर्शनासी । बाबा बोलूं लागले ॥ २३० ॥ हरीबा तूं सभाग्य नर । लग्न करींरे सत्वर । पुत्र देईल शंकर । इच्छा पुरेल मनींची ॥ २३१ ॥ उगीच शंका न वाही मनीं । तुझा सर्वस्वें आहे ऋणी । भोलानाथ शूलपाणी । कर्पूरगौर परमात्मा ॥ २३२ ॥ तें ऐकतां जन हरिखले । म्हणती आतां बरें झालें । संतानुमोदन मिळालें । लग्न दुसरें करावया ॥ २३३ ॥ तरी म्हणती हरीपंत । ज्योतिषाचें पाहिजे मत । तें मिळाल्या निश्चीत । विवाह करीन दुसरा ॥ २३४ ॥ ऐसें बोलून नगरांत गेले । तो पुण्याहून पत्र आलें । कीं एक ज्योतिषी येथें भले । आले असती विद्वान ॥ २३५ ॥ एवंच मत ज्योतिषाचें । पडलें तेधवां अनुकूल साचें । लग्न झालें पंताचें । साईकृपेकरूनी ॥ २३६ ॥ ते स्त्रीपुरुष तरुच्यूत । साईकृपा हा वसंत । फळ त्या वृक्षा येईल सत्य । शंका मुळींच घेणें नको ॥ २३७ ॥ जोंधळा आला पोटरींत । वरी पाऊस पडला बहुत । हवाही शुद्ध अत्यंत । मग कणसाची शंका कां ॥ २३८ ॥ त्या हरिपंत द्विजाची । निष्ठा सायीपदीं साची । योग्यता थोर बाबांची नमन माझें तयातें ॥ २३९ ॥ बाबा साई कृपाराशी । ज्ञाननभींचा पूर्ण शशी । चिंतामणी भाविकासी । चिंतिलें फळ देणार ॥ २४० ॥ नित्य स्मरतां त्या साईपदा । हरतील अवघ्या अपदा । सीताबेद्रे

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाई लीला**